महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९३ वे | दिनांक : ०७/०७/२०२६ | वार : मंगळवार

## शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज; महापौर नागपुरे यांनी केली तयारीची पाहणी



**पुणे** : शहरात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. मुळा-मुठा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली असून, या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट देऊन सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी महापौरांनी शहरातील विविध भागांतील पर्जन्यमान, पाणी साचलेल्या ठिकाणांची स्थिती, मुळा-मुठा नदीपात्रातील पाणीपातळीची माहिती घेतली. तसेच, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी कार्यरत असलेल्या यंत्रणेची तयारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली.

महापौर नागपुरे यांनी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक गतिमान, समन्वयपूर्ण आणि परिणामकारक पद्धतीने कार्यरत ठेवण्याच्या सूचना दिल्या. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले.

पूरप्रवण क्षेत्रे, नदीकाठचा परिसर, पाणी साचणारे भाग तसेच वाहतूक व्यवस्थेवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून आवश्यक कार्यवाही करावी, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

हवामान विभागाकडून प्राप्त होणाऱ्या इशाऱ्यांनुसार परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवणे, आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व संसाधने उपलब्ध ठेवणे, तसेच नागरिकांना वेळोवेळी अधिकृत माहिती उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

पुणे महानगरपालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून कार्यरत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक व तातडीच्या उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी नागरिकांना आवाहन केले की, संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. नदीकाठच्या परिसरात आणि पाणी साचलेल्या ठिकाणी अनावश्यक वावर टाळावा. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ पुणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सोयीसाठी महत्त्वाचे संपर्क क्रमांक जारी करण्यात आले आहेत: पोलीस: १०० / ११२, रुग्णवाहिका: १०२ / १०८, अग्निशमन विभाग: १०१, जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष, पुणे: १०७७ / ०२०-२६१२३३७१, पुणे महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग: ०२०-२५५०१२६९ / ०२०-२५५०६८००.

## वडेट्टीवारांची मागणी; पावसाळी दुर्घटनांची उच्चस्तरीय चौकशी करा



**मुंबई** : राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईसह अनेक भागांत घडलेल्या दुर्घटनांमध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याचा मुद्दा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी विधानसभेत उपस्थित केला. या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी आणि यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी सरकारकडे केली.

विधानसभेचे कामकाज सुरू होताच वडेट्टीवार यांनी पावसामुळे मुंबईत घडलेल्या विविध दुर्घटनांकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, गेल्या दोन दिवसांत मुंबईत मॅनहोलमध्ये पडणे, झाड कोसळणे आणि मानखुर्दमधील इमारत कोसळणे अशा विविध दुर्घटनांमध्ये तब्बल १२ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या घटनांमुळे प्रशासनाच्या तयारीवर आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण, धोकादायक झाडांची छाटणी, उघड्या मॅनहोलची सुरक्षितता, जलनिस्सारण व्यवस्थेची दुरुस्ती आणि आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी आराखडा तयार करण्यात आला असता, तर अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचू शकले असते, असे वडेट्टीवार यांनी सभागृहात नमूद केले. या दुर्घटनांमागील निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असून, केवळ चौकशीच्या घोषणा करून चालणार नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

मुंबई-पुणे मिसिंग लिंक प्रकल्प परिसरात झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेचाही वडेट्टीवार यांनी सभागृहात उल्लेख केला. या घटनेमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि घाट विभागातील रेल्वे वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले.

यापूर्वीही याच प्रकल्पात रस्त्यावरील खड्ड्यांचा प्रश्न समोर आला होता. आता दरड कोसळल्याने हजारो प्रवासी तासन्तास अडकून पडले असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रकरणातही जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ जुलै २०२६


## दूध भेसळ रॅकेट उघड; टोळीवर गंभीर गुन्हा, पुण्यात तपास सुरू

**पुणे :** पुणे ग्रामीणमधील मंचर पोलिस ठाण्यात दूध भेसळीच्या एका संघटित रॅकेटवर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत फसवणूक, बनावटपणा आणि कट रचण्यासह अनेक गंभीर कलमे लावण्यात आली आहेत. तपास यंत्रणांनी हा प्रकार केवळ निकृष्ट दर्जाचे दूध विकण्यापुरता मर्यादित नसून ग्राहकांच्या आरोग्याशी जाणीवपूर्वक खेळ केल्याचा संशय व्यक्त केला आहे.

मंचर परिसरात पोलिसांनी केलेल्या कारवाईत दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ केल्याचे उघड झाले. याप्रकरणी बीएनएसच्या कलम ६१, १११, १२३, २७४, २७५, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमातील कलम २६, २७, ३(१)(झेडझेड)(आयव्ही) आणि ५९ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कलमांमुळे उत्पादन, वितरण आणि विक्रीच्या संपूर्ण साखळीची सखोल चौकशी केली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात दूध, रसायने, उपकरणे आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या साहित्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, त्यांच्या अहवालावर पुढील कारवाई अवलंबून असेल. अहवालात भेसळ सिद्ध झाल्यास आरोपींविरुद्धचे दोषारोपपत्र अधिक भक्कम होण्याची शक्यता आहे.

या गुन्ह्यात अन्न सुरक्षा कायद्यासोबतच फौजदारी स्वरूपाची गंभीर कलमेही लावण्यात आली आहेत. त्यामुळे दोष सिद्ध झाल्यास केवळ आर्थिक दंडच नाही, तर कारावासाची शिक्षाही होऊ शकते. अन्नातील भेसळ हा केवळ ग्राहकांची फसवणूक नसून सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणारा गंभीर गुन्हा मानला जातो.

दूध हा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या दैनंदिन आहारातील एक अत्यावश्यक घटक असल्याने अशा प्रकारच्या भेसळीचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे तपास यंत्रणा पुरवठा साखळीतील प्रत्येक घटकाची चौकशी करत आहेत. या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार आणि आर्थिक लाभार्थी कोण आहेत, याचाही शोध घेतला जात आहे. प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल, जप्त साहित्याचे वैज्ञानिक परीक्षण आणि आरोपींची चौकशी या आधारे या प्रकरणाचा तपास पुढील टप्प्यात अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे.

## पहिल्याच पावसात ‘मिसिंग लिंक’ची पोलखोल?; स्लॅब कोसळताच विरोधक आक्रमक



**मुंबई :** मुंबई-पुणे प्रवासातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पावर अतिवृष्टीमुळे दरड कोसळल्यानंतर आता या मुद्द्यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी या दुर्घटनेवरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत सडकून टीका केली आहे. "मुख्यमंत्री म्हणतात मिसिंग लिंकवर दोन खड्डे पडलेत, पण आज त्यांनी स्वतः जाऊन पाहावे; खड्डे सोडून द्या, तिथे अख्खा मिसिंग लिंकच कोसळला आहे," अशा शब्दांत राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले.

भाजपच्या राजवटीत विकासाच्या नावाखाली प्रचंड भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. "भाजपच्या ताब्यात असलेल्या प्रत्येक शहराची सध्या पावसात काय दैना झालीये, हे मुख्यमंत्री आणि त्यांच्या उपमुख्यमंत्र्यांनी रेनकोट घालून फिरून पाहावे. विकासाचा फार गाजावाजा करतात, पण यामागे दलाली आणि बेफिकिरी दडली आहे," असे राऊत म्हणाले.

"आपले कोण काय वाकडे करणार? आमच्याकडे बहुमत आहे, या अहंकारात हे सरकार आहे. ठेकेदारांकडून 30-35 टक्के आधीच घेतलेले आहेत. ठेकेदारांनी भाजपच्या पक्षनिधीमध्ये पैसे टाकलेत आणि उरलेला टक्का मंत्री, मुख्यमंत्र्यांच्या लोकांना मिळाला आहे. ज्या विकासाचे तुम्ही ढोल वाजवले, तो पाहायला मुख्यमंत्र्यांनी सहकुटुंब तिथे जावे. या विकासाच्या धक्क्यानेच उपमुख्यमंत्र्यांना (एकनाथ शिंदे) अजीर्ण झाले असून ते आजारी पडले आहेत," असा टोला त्यांनी लगावला.

मुंबईतील अपघातांच्या सत्रावरून आणि मानखुर्द दुर्घटनेवरून संजय राऊत यांनी मुंबईच्या महापौर आणि भाजप नेत्यांवर तीव्र शब्दांत टीका केली. "मुंबईत काल मानखुर्दमध्ये सहा निष्पाप लोकांचा मृत्यू झाला. लोकांचा आक्रोश सुरू असताना मुंबईच्या महापौर दिवसभर फोटो काढत फिरत आहेत. माणसे मेली तरी या एका बिल्डरच्या घरच्या बारशाला गेल्या होत्या. तर दुसरीकडे मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम फिदीफिदी हसत आहेत."

"मुंबई आणि महाराष्ट्रावर सध्या दुर्योधनाचे राज्य आलेले आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि त्यांच्या लोकांनी राज्याची अत्यंत वाईट अवस्था करून ठेवली आहे. तिसऱ्या उपमुख्यमंत्र्यांविषयी तर बोलण्याचे काही कारणच नाही, कारण राज्यात काय चालले आहे हे त्यांना कळतच नाहीये. नशीब काल हे आमीर खानच्या लग्नाला गेले नाहीत," अशी खोचक टीका त्यांनी केली.

राम मंदिरातील देणगी चोरीच्या मुद्द्यावर केलेल्या सोशल मीडिया पोस्टचे समर्थन करत संजय राऊत यांनी भाजपवर थेट 'दरोडेखोर' असल्याचा आरोप केला. "इतिहासात मोगलांनी आणि गझनवीने मंदिरे लुटल्याची नोंद आहे. भाजप स्वतःला मंदिराचे रक्षक दाखवून मते मागत होते, पण आज राम मंदिर, केदारनाथ-बद्रीनाथ लुटणारे चोर आणि दरोडेखोर भाजपचेच लोक आहेत. 27 महिला भक्तांनी सीतामाईला अर्पण केलेले सोन्याचे मंगळसूत्रही या लोकांनी लुटले," असा आरोप संजय राऊत यांनी केला.

"शिवसेनेने काल दादरमध्ये 'रामरक्षा आंदोलना'च्या माध्यमातून शंख फुकला आहे. हे आंदोलन फक्त एका दिवसाचे नव्हते, तर आता संपूर्ण महाराष्ट्रात या आंदोलनाचा वणवा पेटल्याशिवाय राहणार नाही," असा इशारा संजय राऊत यांनी दिला.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ जुलै २०२६

# सेवा करार नियुक्ती पाणीपुरवठा योजनेचा प्रकल्प मातीस मिळवतील

**छत्रपती संभाजीनगर :** शहरा साठी असलेली नविन पाणी पुरवठा योजने बाबत प्रशासनाने दिलेल्या आदेशा विरुद्ध वागुन आणि एवढेच काय तर कंत्राटदार जे. व्ही. पी. आर हे सातत्याने प्रशासनाच्या सुचना गांभीर्याने घेत नाहीत.त्यात सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती म्हणजे स्व: हाताने हा प्रकल्प मातीस मिळवतील असे स्पष्ट मत जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे. मुळात ज्यांच्या नियुक्तीचा डाव आखल्या जात आहेत, त्या सगळ्यांना प्रशासनाने या ना त्या कारणाने विभागीय चौकशीत पाणी पुरवठा उपक्रमात दोषी असल्याचे अहवाल स्पष्ट सांगत असतांना त्यांचा परत सेवेत घेण्याचा डाव कोणासाठी व कशासाठी आखला जात आहे ? या मागे कोणाचा दबाव आहे? हे प्रशासनाने गांभीर्याने लक्षात घ्यावे. नसता आम्हाला या बाबत रीतसर शासना कडे दाद मागावी लागणार असुन मनपा मध्येच कार्यरत असणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यां च्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्या बाबतची जाहिरात मनपा प्रशासनाने तात्काळ जनहितार्थ रद्द करावे अशी सुद्धा मागणी त्यांनी केली आहे.वास्तवीक पाहता समस्त शहर वासियांना कंत्राटदार यांचे सह पीएमसी व इतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनिक अधिकाऱ्यांना मुर्ख बनवत आहेत. असे प्रतिपादन उच्च न्यायालया समोर जनहीत याचीके द्वारे जनतेची बाजु मांडणारे जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादन केले असुन कॉफर डॅमचा विषय घ्या,अथवा पाईप लाईन अंथरणे,जागा निवडणे,सर्ज टँक, पाण्याच्या शहर भरात उभ्या करावया च्या ५२ पेक्षा जास्त टाक्यांची जागा असे अनेक तांत्रिक विषय मनपा आणि शासनाने अजूनही विचारात घेतले तर खुप गतिमान स्थिती होऊन किंवा हैड्रोलीक टेस्टिंग शिवाय देयके अदा करू नये अशी बाब असो किंवा निविदा पी एम सी म्हणजे प्रोजेक्ट मॅनॅजमेंट कन्सल्टन्ट असुन नसल्या सारखी असुन करोडो रुपयांची देयके जमा करण्या शिवाय काही एक काम करीत नसुन अशी निष्क्रीय यंत्रणा कशा साठी पोसल्या जात आहेत ?असा परखड सवाल शासना समोर सातत्याने जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी खुप पूर्वीच उपस्थित केलेला असुन घडत असलेल्या सर्व बाबी म्हणजे शहर वासियांना पाण्यापासुन वेठीस धरण्याचा प्रकार असुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे स्वतः राज्यातील इतर पाणी पुरवठा प्रकल्पात पीएमसी म्हणुन कार्यरत इथे मात्र इथे नव्याने पी एम सी नेमला असुन ही उधळपट्टी कशा साठी ? बोलता बोलता तीन हजार कोटी प्रकल्प किंमत ओलांडणाऱ्या आणि त्या पेक्षा मोठ्या असलेल्या प्रकल्पास" यशच अपयश " मिळवुन देईल असे अनेक वेळा जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले असुन उदाहरण द्यावयाचे झाल्यास जालना अंबड पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईनला मजीप्रा म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आत मधून अस्तरीकरण केले नव्हते लोकांच्या "पाणी द्या पाणी द्या " या घाईमुळे ते तसेच राहून गेले आणि तीन वर्षानंतर जल वाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे.घाई करूनही छत्रपती संभाजी नगर शहराला पाणी भेटत नाही हे विशेष. या घाईच्या नादामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भविष्यात उद्भव विहिरी समोरील संपूर्ण बंधारा तोडणार नाही, वास्तविक पाहता तो बंधारा तोडने अत्यंत आवश्यक आहे. कारण की ते तात्पुरते बांधकाम असते. पाण्याच्या घाईमुळे मातीच्या बंधाऱ्या याशिवाय सिमेंटच्या पाईल टाकून अतिरिक्त बंधारा मजीप्रा ने बांधला आणि महानगरपालिके च्या बोकांडी तो जास्तीचा खर्च पडलेला आहे. त्या बंधाऱ्या पुढे विहिरीत पाणी येण्या साठी चॅनल देखील करावयाचा आहे. त्यापूर्वीच घाई घाईमुळे सायफन पद्धतीने पाणी घेतले. आता ती पद्धत देखील दोन दिवस चालली आणि बंद पडली. पुन्हा त्या सायफन पद्धतीचा खर्च वाया गेला. त्यामुळे तरंगते पंप टाकून पाणी घेण्याचा प्रयत्न आहे. म्हणजे सगळं " ट्रायल अँड एरर " म्हणजेच शेखचिल्ली सारखी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची गत झाली आहे.आता पहा ना कंत्राटदार आणि संबधित महाराष्ट्र प्रशासन सामाजीक बांधिलकी अजीबात लक्षात घेत नसुन या प्रकल्पात पेच निर्माण करीत असल्याचे आणि त्यात भरीस भर म्हणजे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती करण्याची प्रसिद्ध केलेली जाहीरात अंत्यन्त अयोग्य असुन प्रशासनाने ही जाहीरात जनहितार्थ तात्काळ परत घ्यावी अशी महत्वाची जनहितार्थ मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर केली आहे.आणि हे सेवानिवृत्त विवक्षित पद्धतीने महानगर पालिकेत आले तर त्यांनी पाणी पुरवठ्या मध्ये किती काळ सेवा केली आहे आणि त्यांना पाणीपुरवठ्याचा काय अनुभव आहे हे देखील गृहीत धरणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी प्रदर्शित केले. विवक्षित पद्धतीने येणारे हे अभियंते महिन्याला ८० ते ९०हजार पगार महानगर पालिके कडून घेतील आणि महानगरपालिकेचा कुठलाही आर्थिक फायदा न होता महानगरपालिका पर्यायाने नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागणार आहे हे निश्चित.

# रसायनशास्त्र विषयात डॉ. पंकज विश्वनाथ पाताळे यांना पीएच. डी. पदवी प्रदान



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत रसायनशास्त्र विषयात मुरुम येथील रहिवासी डॉ. पंकज विश्वनाथ पाताळे यांना नुकतीच पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी आपला संशोधन प्रबंध प्रा. डॉ. जयश्री सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यापीठाकडे सादर केला होता. त्यांना पीएच. डी. प्राप्त झाल्याबद्दल श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्रा. राजकुमार रोहीकर, प्रा. डॉ. सुजित मटकरी, डॉ. सुशील मठपती, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, प्रा. गोपाळ कुलकर्णी, प्रा. अजिंक्य राठोड महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचे सहशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रपरिवार यांनी डॉ. पंकज पाताळे यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.




# गंध फुलांचा कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याचे प्रसिध्द साहित्यिक तथा बँन्डमास्टर अय्युब पठाण लोहगावकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासपत्रिका आठवी, सत्र सहावे यासाठी "मराठवाडी कविता "या अभ्यासक्रमात मराठवाड्यातील निवडक कवितेमध्ये अय्युब पठाण लोहगावकर यांच्या" मर्मगंध "या कवितासंग्रहातून "गंध फुलांचा" ही आशयघन निसर्ग कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जून २०२६ पासून समाविष्ठ करण्यात आली आहे. साहित्यिक तथा बॅन्डमास्टर अय्युब पठाण लोहगावकर हे गेल्या चाळीस वर्षापासून मराठी साहित्य क्षेत्रात सातत्याने दर्जेदार व वास्तववादी लेखन करीत असून आजपर्यंत त्यांची दहा कवितासंग्रह, तीन बालकथासंग्रह, व एक ललितलेखसंग्रह असे चौदा पुस्तके प्रकाशित आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाने महाराष्ट्रातील एका बँन्डमास्तराच्या लेखन साहित्याची दखल घेऊन आणि अभ्यासक्रमात कवितेचा समावेश करून सोनेरी अक्षरांनी प्रथमच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात इतिहास रचलेला आहे. अय्युब पठाण लोहगावकर हे पैठण तालुक्याचे साहित्यरत्न असून सर्व क्षेत्रातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ जुलै २०२६

## भुसणीत वृक्षारोपणातून वन महोत्सव साजरा



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** वन महोत्सव सप्ताहाच्या निमित्ताने मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. सोमवारी (ता. ६) रोजी उमरगा तालुक्यातील भुसणी येथील प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या प्रांगणात पदाधिकाऱ्यांच्या आणि स्वयंसेवकांच्या उपस्थितीत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.पर्यावरणाचे संवर्धन आणि वृक्षारोपणाचे महत्त्व समाजात रुजावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी मान्यवरांनी आणि विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक विवेक जाधव व मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुजित मटकरी, डॉ. रमेश आडे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. विलास खडके, प्रा. गोपाळ कुलकर्णी, लालअहमद जेवळे, दत्ता शेळके आदींच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रतिनिधी, शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्साहाने वृक्षारोपणाच्या कार्यात सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, निसर्गप्रेमींकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## खट्याळ मित्र दोन

हाती नाही आमच्या, मोबाईलचा फोन.
पावसामध्ये उड्या, मारतो आम्ही दोन.

शाळेपुढे खड्ड्यात, उड्या मारते कोण.
पाण्यामध्ये बेडूक, दिसत होते दोन.

बालपणी मित्रांची, वर्गात होती गट्टी.
मित्रात भारी होते, सर्वात हट्टी दोन.

करतांना धिंगाणा, भेटत नाही कोण?
वर्गातील खट्याळ, मैतर होते दोन.

तुमच्यापैकी कोणी, खेळले असे खेळ.
आमच्या सोबतीला, खट्याळ मित्र दोन


मित्रांच्या सोबतीने, निघून जाते वेळ.
जीवनात असावे, लंगोटी मित्र दोन.

शेवटच्या काळात, पैसा अडका नको.
तब्येत जपणारे, मित्र असावे दोन.

**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## महाराष्ट्रातील बदलते पर्जन्यमान आणि मराठवाड्याच्या जलसुरक्षेसाठी जलस्त्रोत वाढविण्याची गरज

महाराष्ट्रात दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, वितरण आणि कालावधी यामध्ये मोठी अनिश्चितता निर्माण होत आहे. त्याचा सर्वाधिक परिणाम मराठवाड्यावर होत असल्याचे दिसून येते. राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्यास मराठवाडा सर्वप्रथम दुष्काळाच्या विळख्यात सापडतो. हवामान बदल, जंगलतोड, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलसंधारणाकडे झालेले दुर्लक्ष आणि पाण्याचे अयोग्य नियोजन यामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर होत आहे.या शोधनिबंधात मराठवाड्याच्या दुष्काळी परिस्थितीची कारणमीमांसा, जलस्त्रोतांचे महत्त्व, भविष्यातील हवामान बदलाचे परिणाम आणि शाश्वत जलव्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजनांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे वाटते.मराठवाडा, दुष्काळ, हवामान बदल, जलसंधारण, जलस्त्रोत, भूजल, पर्जन्यमान, जलसुरक्षा. याचा विचार अधिक प्रमाणात करणे आवश्यक आहे.मराठवाडा हा महाराष्ट्रातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात सरासरी पर्जन्यमान तुलनेने कमी असून पावसाचे वितरण अत्यंत असमान आहे. अनेक वेळा अल्प कालावधीत मुसळधार पाऊस पडतो, परंतु तो जमिनीत मुरण्याऐवजी वाहून जातो. परिणामी भूजल पातळी वाढत नाही आणि उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होते.आज हवामान बदलामुळे भविष्यातील पर्जन्यमान आणखी अनिश्चित होणार असल्याचे अनेक वैज्ञानिक अभ्यास सूचित करतात. त्यामुळे जलस्त्रोतांची निर्मिती, संवर्धन आणि पुनर्भरण ही काळाची गरज बनली आहे.मराठवाड्यातील दुष्काळाची प्रमुख कारणे समजून घेणे योग्य होईल.पावसातील बदलांचा परिणाम अभ्यासणे.जलस्त्रोत वाढविण्याची आवश्यकता स्पष्ट करणे.शाश्वत जलव्यवस्थापनासाठी धोरणात्मक उपाय सुचविणे.समाजसहभागावर आधारित जलक्रांतीची दिशा मांडणे.भविष्यात हवामान बदलामुळे पाऊस कमी पडण्याची तसेच अनियमित होण्याची शक्यता वाढत आहे. जर आतापासूनच जलस्त्रोत निर्माण केले नाहीत, तर मराठवाड्यातील शेती, पशुधन, उद्योग, आरोग्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडू शकते.मराठवाड्यातील दुष्काळाची कारणेकमी आणि अनियमित पर्जन्यमानहवामान हे असे का होत आहे त्याची महत्त्वाची कारणे आपण शोधून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे होत असलेले बदल,जंगलतोड,भूजलाचा,अतिवा पर नद्यांचे आटणे,पारंपरिक जलस्त्रोतांचे नष्ट होणे,जलनियोजनाचा अभाव,पाण्याचा अपव्यय,पाण्याची वाढती मागणी हवामान बदलाचा परिणामहवामान बदलामुळे पुढील परिणाम दिसून येत आहेत:पावसाचे दिवस कमी होत आहेत.अतिवृष्टीच्या घटना वाढत आहेत.सलग कोरडे दिवस वाढत आहेत.तापमान सातत्याने वाढत आहे.बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत आहे.भूजल पुनर्भरण कमी होत आहे. त्यामुळे भविष्य काळामध्ये जलस्त्रोत वाढविण्याची आवश्यकतामराठवाड्यात भविष्यातील जलसुरक्षेसाठी उपाय आवश्यक आहेत.प्रत्येक गावात शेकडो लहान जलसाठे निर्माण करणे.शेततळी.पाझर तलाव.गाळ काढून तलाव खोल करणे.नदी-नाला खोलीकरण.ओढ्यांवर बंधारे.जल पुनर्भरण विहिरी.छतावरील पावसाचे पाणी साठवणे.डोंगर उतारांवर कंटूर ट्रेंचेस.वनसंवर्धन व वृक्षलागवड. जलसंधारण आणि वृक्षलागवड यांचे नातेवृक्ष म्हणजे नैसर्गिक जलसाठा.झाडांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरते.भूजल वाढते.तापमान कमी होते.मृदधूप थांबते.आर्द्रता टिकते.जैवविविधता वाढते.स्थानिक पर्जन्यमान सुधारण्यास मदत होते. समाजसहभागाचे महत्त्व जलग्राम अभियान.श्रमदान.गाव तलाव दत्तक.जलसाक्षरता.विद्यार्थ्यांचे जलशिक्षण.जलमित्र तयार करणे.महिला बचतगटांचा सहभाग.शेतकरी उत्पादक संस्थांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. ते यशस्वीपणे झाल्यास मराठवाड्यामध्ये जलस्तोत्र वाढेल पडणाऱ्या दुष्काळाला सुद्धा समर्थपणे तोंड देता येऊ शकेल सरकारने आणि विशेषतः समाजाने काय करावेप्रत्येक गावासाठी जलसुरक्षा आराखडा.पाच वर्षांत भूजल वाढविण्याचे उद्दिष्ट.प्रत्येक शेतात जलसंधारण.नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम.वृक्षलागवडीला जलसंवर्धनाशी जोडणे.प्रत्येक शाळेत जलशिक्षण.मराठवाड्याचा प्रश्न केवळ कमी पावसाचा नाही, तर पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे व्यवस्थापन करण्याचा आहे. भविष्यात पाऊस आणखी अनिश्चित होण्याची शक्यता लक्षात घेता, आजच मोठ्या प्रमाणावर जलस्त्रोत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. जलसंधारण, वृक्षसंवर्धन, भूजल पुनर्भरण, लोकसहभाग आणि वैज्ञानिक जलनियोजन यांच्या माध्यमातूनच मराठवाड्याला दुष्काळमुक्त आणि जलसंपन्न बनविता येईल.



**विश्वनाथ तोडकर**

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903